कला अकादमी गोवा
कांपाल-पणजी
कअ/काविवि/भ.स्प/२०२१-२२/१०२६
दि.०९/०८/२०२१

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित ४१ व्या पं. मनोहरबुवा शिरगांवकर भजन स्पर्धेच्या प्रवेशिका स्विकारण्याची अंतिम मुदत १२ ऑगस्ट २०२१ असून या दिवशी संध्या ५.०० वाजेपर्यंत कला अकादमीच्या कार्यालयात सदर स्पर्धेचे प्रवेश अर्ज स्विकारण्यात येतील. यंदा १५ ऑगस्ट २०२१ पासून महिला कलाकारांची विभागीय पातळीवरील भजन स्पर्धा फोंडा येथील राजीव गांधी कला मंदिरातूनच सूरू होणार आहे.

अगोदर जाहिर केल्याप्रमाणे कोविड महामारीमुळे यंदा या स्पर्धेचे आयोजन गावागावातील मंदिरातून न करता बंद सभागृहामध्ये कोविडचे सर्व नियम पाळुन केले जाणार आहे. त्यासाठी राजीव गांधी कला मंदिर - फोंडा, रविंद्र भवन - साखळी, रविंद्र भवन - वास्को (मिनी सभागृह), संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालय सभागृह - पेडणे, श्री गणपती देवस्थान हॉल - पर्रा बार्देश, संस्कृती भवन मल्टीपर्पज हॉल - पाटो पणजी येथे आयोजन होणार आहे. आवश्यकता वाटल्यास इतर ठिकाणच्या नाट्यगृहांचा विचार केला जाईल. सभागृहामध्ये कलाकार, परीक्षक, आयोजक व प्रेक्षक धरून जास्तीत जास्त शंभर जणांच्या उपस्थितीत ही स्पर्धा होणार आहे.

कोविड महामारीमुळे यंदा पथकातील कलाकारांची संख्याही मर्यादित केली असून स्पर्धक पथकाला कमीत कमी ८ व जास्तीत जास्त १२ कलाकारांचा आपल्या पथकात समावेश करणे आवश्यक आहे.

दरवर्षी प्रमाणे स्पर्धास्थळी चिठ्ठ्या टाकून स्पर्धेचा अनुक्रम ठरविण्याऐवजी अकादमी सुरवातीलाच सर्व पथकांच्या सादरीकरणाचा अनुक्रम जाहिर करणार आहे. त्यानुसार भजन सादरीकरण करण्याची जबाबदारी संबंधित पथकावर राहिल. सादरीकरणाचा अनुक्रम न पाळणाऱ्या पथकांना भजन सादरीकरण करू दिले जाणार नाही व सदर पथक स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल, याची दखल सर्व पथकांनी गंभीरपणे घेणे आवश्यक आहे.

( श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१. गोमंतक २. नवप्रभा ३. तरुण भारत ४. पुढारी ५. लोकमत
६. दै. हेराल्ड ७. गोवनवार्ता ८. आकाशवाणी पणजी केंद्र ९. दै. भांगरभूंय